संशोधक

श्री. महादेव सुखदेव सुर्यवंशी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विद्यावाचस्पती पदवीच्या अशंत:पुर्ततेसाठी
शारीरिक शिक्षण विद्याशाखेर्तंगत सादर
केलेला संशोधन आराखडा

संशोधन समस्येची पार्श्वभूमी

- धनुर्विद्येच्या अभ्यासातून शारीरिक विकासाबरोबर एकाग्रतेमुळे बौध्दिक विकासही साधला जातो. आणि म्हणूनच आज शालेय स्तर, महाविद्यालयीन स्तर, विद्यापीठीय स्तर, आंतरविद्यापीठीय स्तर अशा विविध स्तरावर धनुर्विद्या या खेळाचा समावेश करण्यात आला आहे. परंतु क्रिकेट, बास्केटबॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल यासारख्या परदेशी खेळांच्या तुलनेत धनुर्विद्या या आपल्या प्राचीन क्रीडाप्रकारातील खेळाडूंची संख्या महाविद्यालयीन स्तरावर कमी आहे. याचे कारण खेळाडूना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना अनेक समस्या जाणवतात. त्यासाठी या समस्यांचा शोध घेऊन त्या समस्या दूर करण्यासाठी धनुर्विद्येच्या विविध कौशल्यांचे विकसन व्हावे या उदद्ेशाने संशोधकाला ही समस्या सुचली.

संशोधन समस्या

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन खेळाडूंना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना येणा-या समस्यांचा शोध : एक अभ्यास

समस्येची व्याप्ती

- सांगली, सातारा व कोल्हापूर या तीन जिल्हयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.
- प्रस्तुत संशोधनातून प्राप्त होणारे निष्कर्ष हे प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालयीन या सर्व स्तरातील धनुर्विद्या खेळाडूंना उपयुक्त ठरणार आहेत.
- प्रस्तुत संशोधनात महिला व पुरुष या दोन्ही प्रकारच्या खेळाडूंचा समावेश केला जाणार आहे.
- प्रस्तुत संशोधनात जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, व आंतरराष्ट्रीय स्तरावरील Indian Archery या क्रीडाप्रकारच्या माहितीचा समावेश केला जाणार आहे.
- प्रस्तुत संशोधनात खेळाडूने प्राप्त केलेल्या कौशल्यांचा उपयोग Indian Archery, Recover Archery, Compound Archery या धनुर्विद्येच्या क्रीडाप्रकारामध्ये होणार आहे.

संशोधनाची मर्यादा Delimitations

- प्रस्तुत संशोधन हे सांगली, सातारा व कोल्हापूर या तीनही जिल्हयातील धनुर्विद्या खेळाडूंपुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन हे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन खेळाडूं पुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन हे धनुर्विद्या या क्रीडाप्रकारापुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन हे Indian Archery या धनुर्विद्येच्या क्रीडाप्रकारापुरते मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन हे १७ ते २५ या वयोगटातील धनुर्विद्येच्या महिला व पुरुष या खेळाडूं पुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापाठांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी) शारीरिक शिक्षण या शिक्षणक्रमापुरते मर्यादित आहे.

संशोधनाची परिमर्यादा Limitations

- प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी खूप कमी कालावधी असल्यामुळे संशोधनासाठी १७ ते २५ या वयोगटातील खेळाडूंची निवड करण्याचे ठरविले आहे. संशोधनातील खेळाडू हे कला, वाणिज्य व शास्त्र या तीनही विद्याशाखेतील आहेत. प्रत्येक विद्याशाखेची महाविद्यालयीन वेळ ही वेगवेगळी आहे. या खेळाडूंचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी संशोधकाला सर्व खेळाडूंच्या सोईची वेळ ठरवताना अडचण निर्माण होईल.

संशोधन समस्येची गृहितके Assumptions

- प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या खेळाडूंना धनुष्य व बाण याची हाताळणी करता येते.
- संशोधनातील खेळाडूला धनुष्याची दोरी ताणता येते.
- खेळाडू लक्ष्याच्या दिशेने बाण मारण्याचा प्रयत्न करतात.
- प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या खेळाडूंची एकाग्रता वाढेल.
- संशोधनातील खेळाडूंच्या दंडाचे स्नायू विकसित होतील.
- संशोधनातील खेळाडू श्वासावर नियंत्रण करतील.
- संशोधनातील खेळाडूंचा बाण टारगेट फेसवर येत नाही.
- कमी अंतरावरुन खेळाडूने मारलेला बाण टारगेट फेसवर येईल.
- जास्त अंतरावरुन खेळाडूने मारलेला बाण टारगेट फेसवर पोहोचू शकणार नाही.

संशोधनाशी निगडीत चले Variables

- **स्वाश्रयी चल** :-Independent Variable

  धनुर्विद्येच्या कौशल्यांचे विकसन करण्यासाठी राबविलेले उपक्रम.
- **आश्रयी चल** :- Dependent Variable
- खेळाडूंच्या कौशल्य संपादणुकीत होणारा बदल म्हणजेच फलनिष्पती.
- **अनियंत्रित चल** :- Uncontrolled Variable
- खेळाडूची मानसिक स्थिती, आर्थिक स्थिती व सभोवतालचे वातावरण.

संशोधनाची उदिद्ष्टे Objectives

- महाविद्यालयीन खेळाडूंना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना येणा-या समस्यांचा शोध घेणे.
- महाविद्यालयीन खेळाडूंना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना येणा-या समस्या दूर करण्यासाठी उपक्रमांची निर्मिती करणे.
- महाविद्यालयीन खेळाडूंना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना येणा-या समस्या दूर करण्यासाठी उपक्रमांची अंमलबजावणी करणे.
- महाविद्यालयीन खेळाडूंना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना येणा-या समस्या दूर करण्यासाठी उपक्रमांच्या अंमलबजावणीची परिणामकारकता अभ्यासणे.
- महाविद्यालयीन खेळाडूंना धनुर्विद्येची कौशल्ये आत्मसात करताना येणा-या समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची परिकल्पना Hypothesis

- **शून्य परिकल्पना** :-

  उपक्रम राबविल्यामुळे नियंत्रित व प्रायोगिक गटातील खेळाडूंच्या संपादणुकीत सार्थ फरक पडत नाही.

- **संशोधन परिकल्पना** :-

  उपक्रम राबविल्यामुळे नियंत्रित व प्रायोगिक गटातील खेळाडूंच्या संपादणुकीत सार्थ फरक पडतो.

संशोधनाची कार्यपध्दती Methodology

- खेळाडूंची सहेतूकपणे निवड केली जाणार आहे.
- खेळाडूंची पूर्व चाचणी घेऊन समान पात्रतेचे दोन गट केले जाणार आहेत.
- प्रायोगिक गटाला बहिरंग योगा, त्राटक योगा, बायसेप, ट्रायसेप, रिष्ट स्प्रिंग, रबर ताणणे,जोर मारणे, डिप्स् मारणे यासारख्या उपायांची मात्रा दिली जाणार आहे.
- नियंत्रित गटाला उपायांची मात्र न देता नेहमीच्या पध्दतीने मार्गदर्शन केले जाणार आहे.
- शेवटी दोन्ही गटांची उत्तर चाचणी घेऊन आलेल्या संख्यात्मक माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले जाणार आहेत.

संशोधन पध्दती Researsch Method

- सर्वेक्षण पध्दती Survey Method
- प्रायोगिक पध्दती Experimental Method

माहिती संकलनाची साधने Instruments &Technique for the data Collection

- प्रश्नावली
- चाचणी

संशोधनाची जनसंख्या व नमुना निवड
Population & Sample

- **जनसंख्या**

  सांगली, सातारा व कोल्हापूर या तीनही जिल्हयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व धनुर्विद्येचे खेळाडू

- **नमुना निवड**

  स्वनिर्णित नमुना निवड पध्दती

सांख्यिकी तंत्र Statistics

- मध्यमान
- प्रमाण विचलन
- सहसंबध गुणांक
- मध्यमानातील फरकाची प्रमाणत्रृटी
- टी-चाचणी
- स्वाधिनता मात्रा

धन्यवाद !